# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

क्रमांक: 3947/शि. वि. दिनांक : 2/3/2015

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

..........सर्व.......... प्राथमिक / उच्च प्राथमिक शाळा.

**विषय :– सशस्त्र सेना ध्वजदिन निधी 2014 संकलनाबाबत.**

**संदर्भ :– 1) जिल्हा सैनिक कार्यालय क्र.1148 / ध्वनिस–14 / जिसैकका–3 दिनांक 27.01.2015.**

**1) शासन निर्णय कमांक मासैध्व –2014 13352 / प्र.क.339 / 28 दि.19.09.2014**

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने सुचित करण्यरात येते की, भारताचे स्वातंत्र्य अबाधीत ठेवणाऱ्या सैनिकांचे आपण ऋणी आहोत. सैनिक हा त्यांच्या कुटूंब पुरताच मर्यादीत नसून तो देशातील सर्व जनतेला स्वतःचे कुटूंब समजून ऊन, पाऊस, यांची तमा न बाळगता वेळप्रसंगी प्राणाची आहूती देतो. सैनिक देशाच्या सीमांचे व स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करतांनाच देशात उद्‌भवणाऱ्या कायदा आणि सुव्यवस्था विषयक समस्या, नैसर्गिक आपत्ती जसे पूर, भूकंप, आग व अपघात इत्यादी प्रसंगी दूर्देवी नागरीकांच्या मदतीला त्वरेने धावून जावून बहूमोल कामगिरी बजावतोव प्रामाणिकपणे कर्तव्यपालन करतो. सैनिकांचे हे ऋण अल्पस्वक्षम स्वरूपात फेडण्याची संधी जनतेला ध्वजदिनाच्या निमित्ताने प्राप्त होत असते. भारतीय भूदल, नौदल, हवाई दलांतील वीरगती लाभलेल्या जवानांचे स्मरण करणे आणि अपंग सैनिकांच्या माजी सैनिक व त्यांच्या कुटूंबीयांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरीता ध्वजदिन निधी उभारला जातो. त्यासाठी 7 डिसेंबर हा दिवस सर्वत्र "ध्वजदिन" म्हणून पाळला जातो.

करिता आपल्या शाळेतील विद्यार्थ्याकडून रु. 2/–याप्रमाणे निधी गोळा करून या कार्यालयात दिनांक 10 / 03 / 2015 पर्यंत जमा करण्याची व्यवस्था करावी.

शिक्षणाधिकारी(प्राथ.),
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

**प्रतिलीपी :–**

1) मा. उपायुक्त म.न.पा. नागपूर.